वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन 2009-10 ते 2019-20

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. (Ph.D.)

पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

श्री सुनिल देवराव मिरासे

एम.ए. सेट (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. टी. एम. गुरनुले

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माहूर, जि नांदेड.

२०२२

वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन

2009-10 ते 2019-20

प्रस्तावना:

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. देशात विविध भाषा, धर्म, जात, वेशभूषा, खानपान, वंश, परंपरा, प्रामुख्याने दिसून येतात. त्याचबरोबर अनेक जाती, जमाती, व जनजाती प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे आणि त्या इतर राज्यात सुद्धा विशिष्ठ संस्कृतीचे जतन करीत समाजाचा महत्वाचा घटक म्हणून सामाजिक, आर्थिक , राजकीय, व्यवस्थेत महत्वाची भूमिका निभावीत आहे . भारतीय संविधानाने भारतातील आदिवासी समुदायांना संविधानाच्या 'अनुसूची ५' अंतर्गत मान्यता दिली आहे. त्यामुळे राज्यघटनेने मान्यता दिलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून ओळखले जाते. जागतिक पातळीवर प्रत्येक देशात आदिवासी जमात कमी-जास्त प्रमाणात आहेत त्याचप्रमाणे प्रत्येक प्रदेशात त्यांना वेगवेगळया नावाने ओळखले जाते. ज्या प्रमाणे मूळनिवासी, गिरीजन, वनवासी, आदिम, जंगलाचे राजे, धर्तीचे लेकरे, अश्या अनेक आदिवासी जमातीचा अभ्यास करणारे तज्ञ संशोधकानी उल्लेख केलेला आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत आदिवासींना ‘अनुसूचित जमाती’ असे संबोधले आहे.

आदिवासी लोकसंखेच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक असून पहिला क्रमांक आफ्रिकादेशाचा आहे. भारताच्या 2011 च्या जनगणने नुसार आदिवासी जमातीची एकूण लोकसंख्या 10,42,81,034 असून एकूण लोकसंखेच्या 8.6% आहे. भारतात आदिवासी जमातिची सर्वाधिक लोकसंख्या असणारे चार राज्य मध्यप्रदेश, महाराष्ट्र ,ओडिशा व राजस्थान आहेत. 2011 च्या जनगणने नुसार एकूण 705 आदिवासी जमाती भारतात अधोरेखित करण्यात आल्या आहेत. त्यातील एक आंध आदिवासी जमात आहे.

2011 च्या जनगणने नुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 11,23,74,333 इतकी होती .त्या पैकी आदिवासी लोकसंख्या 1,05,10,213 आणि त्यात आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या

4,74,110 आहे. महाराष्ट्रातील 36 जिल्ह्या पैकी प्रमुख्याने 6-7 जिल्ह्यात या जमातीचे वास्तव्य जास्त प्रमाणत आहे. महाराष्ट्रात आदिवासीच्या एकून 4 5 जमाती असून त्या मध्ये 'आंध' जमात ही मुख्य जमात आहे. आंध जमात ही मुळात: नांदेड, हिंगोली, परभणी, वाशिम, यवतमाळ, अकोला या जिल्ह्यात लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे. महाराष्ट्रात अशा या जमातीचे वास्तव्य जंगलात, अतिदुर्गम डोंगराळ प्रदेशात, द-या खो-यात, बेट-वाड्या, तांड्यात वास्तव्य करताना दिस ते. आदिवासी लोकसंखेच्या बाबतीत महाराष्ट्र हा देशात सहाव्या क्रमांकावर आहे यातील काही लोकं शासकीय योजनाचा लाभ घेत उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, सामान्य शिक्षण, कौशल्य विकास शिक्षण, संगणक प्रशिक्षण घेऊन शिक्षणाच्या प्रवाहात आले आणि आपल्या डोंगराळ प्रदेशा तून आणि द-या खो-यातून निघून शहराच्या ठिकाणी आंध आदिवासी लोक व्यवसाय उद्देशाने शहराकडे तर काही लोक शासकीय नोकरीला रुजू झालेले दिसत आहेत. यामुळे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात त्याची लोकसंख्या वाढताना दिसत आहे.

आंध आदिवासी जमात ही सामान्यपणे जंगलात, अतिदुर्गम डोंगराळ प्रदेशात, बेट-वाड्या, तांड्यात वास्तव्य करताना दिस ते. त्यांच्याकडे शासनाचे लक्ष नसल्यामुळे त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास झालेला दिसून येत नाही. आंध आदिवासी जमात ही ग्रामीण भागात जास्त प्रमा णात असून यांची शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नवर होत आहे. अल्पउत्पनामुळे त्याना खाजगी कर्ज पुरवठा, बँकेच्या कर्ज पुरवठा यावर अवलंबून रहावे लागते.

वाशिम जिल्ह्याची 2011 च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्या 11,97,160 असून आदिवासी जमातीची एकूण लोकसंख्या 80471आहे. त्यात आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या 63,577 आहे. आणि साक्षरता दर 83.2% आहे. वाशिम जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा आर्थिक विकास व्हावा म्हणून आदिवासी विकास विभागाची स्थापना अकोला येथे करण्यात आली आहे. जिल्ह्यातील आंध लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या आंध लोकांची संख्या या जिल्ह्यात सर्वाधिक आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे लोक शेतीला जास्त महत्व देतात.

आदिवासी जमातीची निवडक व्याख्या:

1. **W.J.Perry** :- "A tribe is a group speaking common dialect and inhabiting a common territory."

   डॉ. डब्ल्य.जे .पेरी च्या मते:- "समान बोलीभाषा बोलणा-या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी म्हणतात."

२. **Dr. Rivers :-** "Tribe is social group of a simple kind, the members of which speak common dialect act together in such common purposeas wartare."

   डॉ.रीव्हर्स च्या मते :- "ज्या समुहातील सदस्य एक समान बोली भाषा बोलतात युद्ध वगेरेसारख्या उद्दिष्टपुर्ती करी ता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सानाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात."

३. Gillin and Gillin :- "Any collection of preliterate local groups which occupies a common general territory, spells a common language and practices a common culture is a tribe."

   गिलान व गिलान यांच्या मते :- "एक विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोली भाषा बोलणारा व एकच (समान) सांस्क्रतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."

४. **बोगार्डस च्या मते :-** "सुरक्षिततेची जरुरी रक्तसंबंधाचे समान धर्म यावर आधारलेला समूह म्हणजे आदिवासी समाज होय."

५. **इंपिरीअल गेझेटनुसार व्याख्या :-** "समान बोलीभाषा बोलणा-या एकाच भूभागात राहणा-या सुरवातीस अंतर्विवाही असण्याची शक्यता असणा-या पण सर्व सामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणा-या कुटूंबच्या समुच्यायाला आदिवासी समाज असे म्हणतात."

संशोधनाची कालमर्यादा व क्षेत्रमर्यादा

प्रस्तुत संशोधन विषय **“वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमाती चे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन 2009-10 ते 2019-20”** असा आहे . संशोधन विषयाचे क्षेत्रमर्यादा ही वाशिम जिल्ह्या यात मालेगाव, मानोरा, मंगरूळपीर, कारंजा, वाशिम व रिसोड या सहा तालूक्या परिक्षेत्रापुरते मर्यादित आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टये

संशोधन अध्ययनासाठी जो विषय निवडलेला आहे त्या त विविध पैलू आहेत. त्यापैकी कोणकोणत्या पैलूचा अभ्यास केला जाणार आहे , हे अध्ययनाच्या उद्दिष्ठ ये स्पष्ट क रावे लागते. ‘‘वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन 2009-10 ते 2019-20” या विषयाच्या संशोधना साठी पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीच्या सर्वांगीन जीवनाचा अभ्यास करणे.
2) वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीच्या आर्थिक परीस्थीतीचा अभ्यास करणे.
3) वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थितीचा व समस्या चा अभ्यास करणे.
4) वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीसाठी असलेल्या विविध योजनाचा अभ्यास करणे.
5) आंध आदिवासी जमातीच्या राहणीमानातील झालेला बदलाचा अभ्यास करणे.

संशोधन वियाचे महत्व

वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमात आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक दृष्टीने मागासलेली आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीविषयी अध्ययन करण्या साठी उत्पन, रोजगार, शेती, बचत, दारिद्र्य़, शासकीय योजना, शिक्षण इत्यादी घटकाच्या आधारे आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्या साठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन विषयाची गृहितके

आपली अध्ययन पद्धती स्पष्ट करताना आपण कोणकोणती गृहीतके किवा उपकल्पना पडताळण्या करिता घेतल्या आहेत. त्याची क्रमवार मांडणी करणे आवश्क ठरते. "वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमाती चे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन 2009-10 ते 2019-20 " या विषयाच्या संशोधना साठी पुढील गृहितके निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) आंध आदिवासी जमातीच्या शेतक-यांचे जमीन धारण क्षेत्र कमी आहे.
2) आंध आदिवासी जमातीची शेती निसर्गावर अवलंबून आहे.
3) आंध आदिवासी जमातीची शेती खाजगी कर्जपुरवठ्यावर अवलंबून असून कर्जबाजारीपणा हे एक आर्थिक मागासलेपणाचे कारण आहे.
4) आंध आदिवासी जमातीची आर्थिक बचत कमी आहे.
5) आंध आदिवासी जमातीला शासकीय योजनांचा लाभ पुरेश्या प्रमाणात मिळत नाही.
6) आंध आदिवासी जमातीची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती नगण्य प्रमाणात आहे.
7) आंध आदिवासी जमातीच्या वस्तीची गृहरचना मागासलेली असून त्यामध्ये विविध सुविधाचा अभाव आहे.

संशोधन पद्धती

"वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन 2009-10 ते 2019-20" या विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये वापरण्यात येणा-या विविध संशोधन पध्दतीपैकी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक व दुय्यम अश्या दोन्ही सामग्रीचा आधार घेतला जाणार आहे.

प्राथमिक अध्ययन पद्धतीत मुलाखत, अनुसूची, निरीक्षण, प्रश्नावली इत्यादीच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ माहिती व आकडेवारी संकलित केली जाईल.

द्वितीय सामग्री माध्यम म्हणून ग्रंथ/पुस्तके व शासकीय दस्ताऐवज आणि सांख्यिकीय दस्ताऐवज तसेच साप्ताहिक व मासिक इत्यादीचा वापर करण्यात येईल.

आकडेवारीचे विश्लेषण प्रस्तुत संशोधनातील विषयाच्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधनातील उपलब्ध आकडेवारीनुसार गणितीय व सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. उदा. मध्यमान, मध्यगा, प्रमाप विचलन, टी-टेस्ट, एफ-टेस्टे, ANOVA, समाश्रयण विश्लेषण इत्यादी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ता आलेखाचा उपयोग करण्यात येईल.

2011 **नुसार वाशिम जिल्ह्यातील आदिवासी जमातीची लोकसंख्या**

अ.क्र	**तालुके**	**एकूण लोकसंख्या**			**आदिवासी जमातीची लोकसंख्या**			**एकूण लोकसंखेशी आदिवासी जमातीचे प्रमाण**
		एकूण	**पुरुष**	**स्त्रिया**	**एकूण**	**पुरुष**	**स्त्रिया**	**टक्के वारी**
1	**वाशिम**	255188	132758	122430	6867	3633	3234	2.6
2	**मालेगाव**	189051	98035	91016	25804	13212	12592	13.64
३	**रिसोड**	207545	315478	99612	9203	4718	4485	4.43
4	**मनोरा**	156344	80931	75413	22121	11353	10768	14.14
5	**मंगरूळपीर**	175208	90882	84326	10478	5446	5032	7.21
6	**कारंजा**	213824	109763	104061	5998	3041	2957	2.80
	एकूण	1197160	827847	576858	80471	41403	39068	6.72

संदर्भ:- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2020 **वाशिम जिल्हा, पुष्ट.क्र** 238-239

वाशिम जिल्ह्यात वरील तक्ता मध्ये दर्शविल्या प्रमाणे सहा तालु क्यात आदिवासीची एकूण लोकसंख्या 80471 आहे. त्यामध्ये आंध आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या 63577 आहे. या सहा तालुक्यातील प्रती तालुका 10 गावे या प्रमाणे 60 गावाची निवड नमुना पाहणीसाठी केली जाईल. या गावाची निवड करताना ज्या गावात एकून लोकसंख्याच्या प्रमाणात बहुसंख्य आंध जमातीच्या आदिवासीची लोकसंख्या आहे आशाच गावांची निवड करण्यात येईल. तसेच प्रतेक गावातून सहेतुक

नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling Method) कुटूंब संखेच्या प्रमाणात एकूण कुटुंबाची निवड करण्यात येईल. म्हणजेच नमुना पाहणीसाठी एकून 600 कुटंब निवडण्यात येतील . मुलाखत अनुसूची तंत्राचा वापर करून संशोधन अध्ययनासाठी आवश्यक ते तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची रूपरेषा

प्रकरण पहिले — प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात अध्ययन विषया संदर्भात प्रस्तावना, आदिवासी समाजाविषयी माहिती आदिवासी शब्दाचा अर्थ, आदिवासी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी वाशिम जिल्ह्या ची भोगोलिक व आर्थिक स्थिती, हवामान, पर्जन्यमान, क्षेत्रफळ, स्थान व विस्तार, महाराष्ट्रातील आंध जमातीच्या लोकसंख्येचा आढावा, आंध जमातीचे घटनात्मक स्थान व संविधानात्मक तरतूद, आंध जमातीची भाषा इत्यादी बाबीचे अध्ययन केले जाईल.

प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

आदिवासी जमातीचे आर्थिक, सामाजिक , शैक्षणिक दुर्ष्टी कोनातून विविध तज्ञानी केलेल्या संशोधन साहित्याचा अभ्यास करून थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे — संशोधन पद्धती

या प्रकरणात संशोधन विषयाची निवड, महत्व आणि संशोधनाची उदिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन क्षेत्र, संशोधन कालावधी व पद्धत माहितीचे स्त्रोत इत्यादी अध्ययन केले जाईल.

प्रकरण चौथे — आदिवासी जमातीचे आर्थिक व सामाजिक जीवन

या प्रकरणात आर्थिक समस्या कृषिक्षेत्र, शेतमजुरी,पीकरचना, सिंचनक्षेत्र, दुग्धव्यवसाय, मासेमारी, दरडोई उत्पन्न , शिकार , मोळ्या विक्री , डिंक , तेदु पत्ता विक्री , चारोळ्या विक्री , रोजगार व बेरोजगार इत्यादी उत्पनाची साधने आहेत या साधनाचा अभ्यास केला जाईल. तसेच पायाभूत सुविधा, रस्ते व रेल्वे मार्ग , सामाजिक वैशिष्ठे शिक्षण , आरोग्य, आहार , राहणीमान, घरे , स्वच्छता या सामाजिक गोष्टीचा अभ्यास केला जाईल याच्या आधारे सामाजिक जीव नाचा आर्थिक जीवनावर कशा प्रकारे परिणाम होतो ते अभ्यासता येईल.

प्रकरण पाचवे — आंध जमातीसाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना

या प्रकरणात आंध आदिवासीच्या विकासा साठी सरकारने आंध जमातीच्या उपयोजना, पिक व खावटी योजना घर कुल योजना याचे अध्ययन आणि निधीचा केलेला वापर, तसेच विकासाचा आढावा व उणीवा यांचे अध्यन केले जाईल.

प्रकरण सहावे - तथ्ये संकलन व आशय विश्लेषण

प्रकरण सातवे - निकर्ष व शिफारशी

संदर्भसूची

आगलावे, प. (२०००). *सामाजिक संशोधन पद्धतीशात्र व तंत्र.* नागपूर : श्री विद्या प्रकाशन

काळे, ब. (२०१५). *केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास योजना.* ओरंगाबाद: संदर्भ प्रकाशन ओरंगाबाद.

गारे, ग. (२००१). *पैनगंगा नदीच्या खो-यातील आंध आदिवासी .* पुणे : श्रीविद्या प्रकाशान २५० शनिवार पेठ अष्टभुजा रस्ता पुणे .

जाधव, ड. स. (२०१२). *भारतीय आदिवासी समाज .* औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.

तेगमपुरे, म. (२००९). *आदिवासी विकास आणि वास्तव.* ओरंगाबाद: चिन्मय प्रकाशन ओरंगाबाद.

देवगावकर, ए. ज. (२००९). *महाराष्ट्रतील निवडक जाती जमाती.* नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

देशमुख, स. (२००७). *आदिवासी समाजाचे दारिद्र्य.* नांदेड: निर्मल प्रकाशन नांदेड.

धुमाळे, व. (२०१६). *आंध आदिवासी जमात इतिहास व संस्कृतीक वारसा.* पुणे : सुपर्ण प्रकाशन १५३/३ पोकळे बिल्डींग, दुसरा मजला धायरी गाव पुणे .

भांडारकर, ड. प. (१९९९). *सामाजिक संशोधन पद्धती* . नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळासाठी वसंत पिंपळापुरे विद्या बुक्स ओरंगाबाद.

वाशिम, न. व. (२०२०). *जिल्हा सामाजिक व आर्थिक समाचोलन.* वाशिम: अर्थ व संखिकीय संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन .

हिस्सल, ड. व. (२०१३). *संशोधन पद्धती (अर्थशात्र).* लातूर : अरुना प्रकाशन लातूर .

संशोधक विद्यार्थी — **संशोधन मार्गदर्शक**

श्री सुनिल देवराव मिरासे — **प्रा.डॉ. टी . एम . गुरनुले**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री रेणुकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
माहूर, जि नांदेड.